महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
३ रा मजला, कोंकण भवन (विस्तारीत), सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
संकेतस्थळ : www.mahaswayam.gov.in ई मेल: dese.desk1@gmail.com
दूरध्वनी क्र.: ०२२-२७५७१९४२

# जाहिरात

## शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य या राज्यस्तरीय कार्यालयामध्ये **महाराष्ट्र प्लेसमेंट एजन्सी अधिनियम (विनियमन), २०२५ (MPPA ACT २०२५), CM Mahafund (मुख्यमंत्री महाफंड) योजना, प्रधानमंत्री इंटर्नशीप योजना (PMIS), खाजगी कौशल्य विद्यापीठ व DAKSH (Development of Applied Knowledge and Skills for Human Development) प्रकल्पांतर्गत आयुक्तालयीन विषय** इत्यादी बाबींचे कामकाज करण्यासाठी शासकीय / निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांकडून या जाहिरातीत नमुद पदांसाठी निवडसूची तयार करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

या आयुक्तालयामध्ये कामकाज करण्यासाठी इच्छुक असलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी संकेतस्थळावर नमुद विवक्षित अनुभव व अर्हता असणे आवश्यक आहे. या कामाचे **पारिश्रमिक, अटी व शर्ती** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

❖ **कामाचा तपशिल, आवश्यक पदे, कालावधी :-**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अनुभव | एकूण पदे | वयोमर्यादा | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १. महाराष्ट्र प्लेसमेंट एजन्सी अधिनियम (विनियमन), २०२५ (MPPA ACT २०२५)<br>२. मुख्यमंत्री महाफंड (CM Mahafund) योजना<br>३. प्रधानमंत्री इंटर्नशीप योजना (PMIS)<br>४. खाजगी कौशल्य विद्यापीठ<br>५. Development of Applied Knowledge and Skills for Human Development (DAKSH) प्रकल्पांतर्गत आयुक्तालयीन स्तरावरील विषय. | कौशल्य विकास, उच्च व तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, कामगार व औद्योगिक क्षेत्रातील केंद्र व राज्य स्तरावरील विविध उपक्रम, योजना व प्रशासकिय कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | ०३ | किमान ५८ वर्ष व कमाल ६५ वर्ष | दक्ष सभागृह, तळ मजला, एल्फिस्टन तांत्रिक महाविद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४००००१. |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद कामकाज करण्यासाठी इच्छुक असलेल्या पात्र अधिकारी यांनी विहीत पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि, या आयुक्तालयात उपरोक्त कामकाज करण्यासाठी इच्छुक असलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी आपला अर्ज मा.आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, खोली क्र.३२३, ३ रा मजला, कोंकण भवन (विस्तारीत), सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ यांच्याकडे प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा dese.desk1@gmail.com या ई-मेलवर सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून **१० दिवसांच्या** कालावधीत शासकिय सुट्टीचे दिवस सोडून **सकाळी ९.४५ ते सायंकाळी ०६.१५** वाजेपर्यंत सादर करावे.

१) मासिक पारिश्रमिक - सेवानिवृत्तीच्या वेळेस असणाऱ्या वेतन व शासन निर्णयाप्रमाणे.
२) वय - किमान ५८ वर्ष ते कमाल ६५ वर्षापर्यंत.

उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चा अलिकडचा पासपोर्ट साईज फोटो, अर्हता प्रमाणपत्रांच्या तसेच राज्य शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचा PPO ची छायांकित प्रत, शैक्षणिक अर्हता व अनुभव यांच्या प्रमाणित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. त्याचप्रमाणे संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी नमुद करण्यात यावा. अर्जासोबत स्वत:चा पत्ता लिहिलेला व पुरेसा पोस्टेज असलेला लिफाफा जोडावा तसेच उत्कृष्ट काम केले असल्याबाबत काही प्रमाणपत्र असल्यास ते जोडावे.

स्वा /-

**आयुक्त**

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

महाराष्ट्र राज्य

# सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी अटी व शर्ती

१) करारपध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास दक्ष सभागृह, तळ मजला, एल्फिस्टन तांत्रिक महाविद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४००००१.

२) सदरची नियुक्ती ११ महिन्यांच्या कालावधी करीता करण्यात येत आहे.

३) करार कालावधीमध्ये केलेल्या कामकाजाचा मा.आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांचेकडून आढावा घेतल्यानंतर कामाची व्याप्ती लक्षात घेऊन वाढीव कालावधीकरीता कराराचे नुतनीकरण करण्यात येईल.

४) सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रामिक अनुज्ञेय राहील.

५) करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

६) करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वर्यामर्यादा हि ६५ वर्षापेक्षा अधिक नसेल.

७) असा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असलेबाबत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

८) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षीत काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तींची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, आयुक्तालयाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याबाबींचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात येईल.

९) नियुक्त अधिकाराऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसल्याबाबत खारतजमा करण्यात येईल.

१०) नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी अशा अधिकारी यांची करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

११) नियुक्ती अधिकारी यांना शासकिय वाहन अनुज्ञेय / उपलब्ध असणार नाही. तसेच नियुक्त अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळेच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

१२) नियुक्त करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले अधिकारी हे आयुक्त, कौशल्य, विकास, रोजगार व उद्योजकता यांचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.

१४) नियुक्त करण्यात आलेले अधिकारी यांना त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

१५) करारपध्दतीने घेण्यात आलेल्या अधिकारी यांची बैठक व्यवस्था कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या जागेनुसार करण्यात येईल.

१६) नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी यांना कंत्राटी सेवा कालावधी मध्ये राजीनामा द्यावयाचा असेल तर एक महिना अगोदर नोटीस देणे बंधनकारक आहे. अन्यथा एक महिन्याचे वेतन जमा करावे लागेल.

१७) अधिकारी सतत ०७ दिवस पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर असल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा संपुष्टात येईल.

१८) भरती प्रक्रीया राबविणे, स्थगित करणे किंवा रद्द करण्याचे पुर्ण अधिकार मा.आयुक्त यांच्याकडे असतील.

१९) सेवानिवृत्त शासकिय अधिकारी यांनी दिलेल्या नमुन्यामध्येच अर्ज भरावयाचा आहे.

*****

# अर्जाचा नमुना

Passport Size Photo

१. अर्जदाराची वैयक्तिक माहिती

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | जन्म तारीख व वय | |
| ३ | लिंग | |
| ४ | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता | |
| ५ | ई-मेल आयडी | |
| ६ | भ्रमणध्वनी क्र. | |

२. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | इयत्ता / पदवी | वर्ष | शाळा / कॉलेजचे नाव | विद्यापीठ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

३. शासकीय कामाची माहिती

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नाव व पत्ता | |
| २ | ज्या पदावरून सेवानिवृत्त झाले त्या पदाचे नाव | |
| ३ | प्रवर्ग/गट व वेतनश्रेणी | |
| ४ | एकूण शासकीय सेवेचा कालावधी व त्याचा तपशील | |
| ५ | सोपविण्यात आलेल्या कामाचा तपशील | |

| | | |
|---|---|---|
| ६ | **संगणक हाताळणीचे ज्ञान आहे का?** | होय / नाही |
| ७ | **शासकीय सेवेत असताना विभागीय चौकशी झाली आहे का?** | होय / नाही |
| ८ | **असल्यास तपशील द्यावा** | |
| ९ | **केंद्र/राज्य शासनाच्या योजना/ उपक्रम राबविल्याचा अनुभव असल्यास तपशिल** | |
| १० | **अन्य नमूद करण्याजोगी बाब** | |

**घोषणा**

उपरोक्त अर्जात नमूद केलेली माहिती मी प्रामाणिकपणे जाहीर करीत आहे. सदर माहिती खोटी आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी असेल. तसेच, विवक्षित प्रकारचे कामकाज करार पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक कर्तव्ये व जबाबदाऱ्या मी जाहिरात/सूचनेमध्ये काळजीपूर्वक वाचल्या असून, त्यातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**
**दिनांक :-**

सही

(अर्जदाराचे नाव)

*वरीलप्रमाणे नमुद सर्व कागदपत्रांच्या स्वक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

(उपरोक्त अर्जाची सॉफ्ट कॉपी प्राप्त करण्यासाठी येथे क्लिक करा Application form .)